प्रेस नोट दि.२१/०२/२०२४

# सराईत गावठी हातभट्टी दारु व्यावसायीक रमेश बाळु चव्हाण वय ४७ वर्षे, रा. बक्षी हिप्परगा, ता. द.सोलापूर, सोलापूर, यास एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्द.

सोलापूर शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार **रमेश बाळु चव्हाण वय ४७ वर्षे, रा. बक्षी हिप्परगा, ता.द. सोलापूर, सोलापूर** यास एमपीडीए अधिनियम, १९८१ अन्वये दि.२१/०२/२०२४ रोजी स्थानबध्द केले आहे.

रमेश चव्हाण हा त्याच्या साथीदारांसह स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीतील परिसरात गेल्या अनेक वर्षापासून अवैध गावठी हातभट्टी दारुच्या व्यवसायात गुंतलेला आहे. तो महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतुदीचा भंग करुन हातभट्टी दारुची वाहतुक, पुरवठा आणि विक्री करत असल्याबद्दल त्याचे विरुध्द एकूण १४९ गुन्हे दाखल आहेत. सन २०१६ मध्ये एमपीडीए अधिनियम, १९८१ अन्वये, सन २०२० व २०२२ मध्ये क.९३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमानुसार प्रतिबंधक करुन देखील त्याचे गुन्हेगारी वर्तणूक सुटत नव्हती. त्याने पुन्हा अवैध हातभट्टी दारुचा व्यवसाय चालूच ठेवलेला होता. सन २०२३ मध्ये अगदी अलीकडील कालावधीत त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतुदीचा भंग करुन ०७ गुन्हे केलेले आहेत.

रमेश चव्हाण हा हातभट्टी दारु व्यवसायाचा मालक आहे. हातभट्टी दारुची वाहतुक करताना तो आणि त्याचे साथीदारासह त्यांची वाहने निष्काळजीपणे चालवून रस्त्यावरुन जाणा-या लोकांच्या आणि परिसरातील रहिवाशी यांच्या जिवीतास धोका निर्माण करत आहे. त्याच्या बेकायदा व्यवसायास विरोध करणारे किंवा पोलीसांना माहिती देणारे लोकांना तो त्याच्या साथीदारासह उघडपणे शस्त्रासह मारहाण करतो. अशा प्रकारची गुन्हेगारी कारवाई करुन रमेश चव्हाण याने परिसरात दहशत निर्माण करुन सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण केली आहे.

रमेश चव्हाण याच्या अवैध हातभट्टी दारुच्या व्यवसायामुळे जोडभावी पेठ पो.ठाणे हद्दीतील सार्वजनिक सुव्यवस्था बाधीत होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे, भविष्यात सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी मा. पोलीस आयुक्त यांनी त्यास एमपीडीए अधिनियम, १९८१ अन्वये स्थानबध्दतेचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यास आदेशाची बजावणी करुन येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल करण्यासाठी रवानगी करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही, मा. एम. राज कुमार, मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली, मा.डॉ.दीपाली काळे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), मा. विजय कबाडे पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, अशोक शा. तोरडमल, सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-०१, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे, तत्कालीन वपोनि राजेंद्र करणकोट, वपोनि सुहास चव्हाण, जोडभावी पेठ पोलीस ठाणे, पोउपनि/विशेंद्रसिंग बायस व एमपीडीए पथकातील अंमलदार पोहेकॉ-/८३३ विनायक संगमवार, पोहेकॉ/१२५४ सुदीप शिंदे, पोशि/१९१६ अक्षय जाधव, पोशि/६५४ विशाल नवले यांनी केली आहे.

---

(डॉ. दिपाली काळे)
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे शाखा)
सोलापूर शहर

सोलापूरातील प्रसिध्द दैनिक वृत्तपत्र/इलेट्रीक मिडीया संपादक
वरीलप्रमाणे बातमीपत्र आपले लोकप्रिय दैनिकामध्ये जनहितार्थ प्रसिध्द करणेस विनंती आहे.